## नियमीत दिवाणी दावा क्र.१/२०१८, नि.क्र.२९ वरील आदेश

( सुप्रिया विभुते वगैरे वि. कविश विभुते वगैरे )

[ CNR No.MHSO12-000018-2018 ]

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२) वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा दाखल करते वेळी यातील वादी क्र.१ सुप्रिया कविश विभुते ही अज्ञान असल्याने तिचे अ.पा.क. म्हणून वादी क्र.२ आई सुषमा कविश विभुते यांनी वादी क्र.१ करीता व स्वतःकरीता सदरचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना वादी क्र.१ सुप्रिया ही दिनांक १५/०८/२०२१ रोजी सज्ञान झालेली आहे. सबब त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे जरुरीचे व न्यायाचे आहे. म्हणून सदरचा अर्ज.

३) प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा प्रलंबित ठेवण्यासाठी वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४) अर्ज, त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर दावा हा जाहीर ठराव होऊन मिळणेसाठी व सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन आहे की, यातील वादी क्र.१ सुप्रिया ही दिनांक १५/०८/२०२१ रोजी सज्ञान झालेली आहे. वादी क्र.१ सुप्रिया कविश विभुते हिचे जन्म प्रमाणपत्र नि.क्र.३३ कडे दाखल असून त्यावरुन असे स्पष्ट होते की, वादी क्र.१ सुप्रिया हिचा जन्म दिनांक १५/०८/२००३ रोजी झाला असून ती दिनांक १५/०८/२०२१ रोजी सज्ञान झालेली आहे. करीता त्यासंदर्भात दाव्यात दुरुस्ती होणे गरजेचे आहे. वादी यांनी सुचवलेली दुरुस्ती मंजूर केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात

कोणताही बदल होणार नाही, तसेच प्रतिवादींचे ही काही नुकसान होणार नाही. या उलट प्रतिवादी यांना दुरुस्त कैफीयत देण्याची मुभा राहणार आहे. अर्ज नामंजूर झाल्यास पुढील गुंतागुंत वाढणार असून नवीन दाव्याची उत्पत्ती होणार आहे. अशा परिस्थितीत, दाव्याचा गुणदोषावर निर्णय करण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित ठरणार आहे. सबब वरील बाबींचा विचार करता, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करण्याचे आहे.

सही/- xxx

दिनांक – ०८/११/२०२१

( **संपुर्णा क. कारंडे** )

सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | R.P. Sakinal, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. Civil Judge Sr. Div. and Addl. C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 08.11.2021 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 08.11.2021 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 08.11.2021 |